महाराष्ट्र शासन
MSSDS
**महाराष्ट्र राज्य कौशल्य विकास सोसायटी**
४ था मजला, महानगर टेलिफोन निगम लिमिटेड एक्स्चेज बिल्डींग, जी. डी. सोमाणी मार्ग, मुंबई- ४०० ००५

ई-मेल : ceo@mssds.in दुरध्वनी क्र.: 022 22160210/11

जा .क्र.MSSDS/ ~~PEI~~/DDR/D/02/2015-16/651 दि. 21/11/16

# मार्गदर्शक सूचना

महाराष्ट्र राज्य कौशल्य विकास सोसायटीकडे सूचीबध्दतेकरिता इच्छुक असणाऱ्या संस्थाना खालीलप्रमाणे मार्गदर्शक सूचना निर्गमित करण्यात येत आहेत.

१. महाराष्ट्र राज्य कौशल्य विकास सोसायटी तर्फे व्यवसाय प्रशिक्षण संस्थाना सुचिबध्देतेकरिता सल्लागार प्रतिनिधी म्हणून कोणत्याही त्रयस्थ व्यक्ती वा संस्था यांना नियुक्त वा प्राधिकृत करण्यात आलेली नाही.

२. महाराष्ट्र राज्य कौशल्य विकास सोसायटीमार्फत राबविण्यात येणाऱ्या सर्व योजना राबविण्यासाठी कोणत्याही व्यक्ती वा संस्था यांना नियुक्त वा प्राधिकृत करण्यात आलेले नाही.

३. महाराष्ट्र राज्य कौशल्य विकास सोसायटीमार्फत सूचीबध्दतेकरिता तपासणी शुल्क संकेतस्थळावर नमूद करण्यात आलेले आहे.

४. महाराष्ट्र राज्य कौशल्य विकास सोसायटी अंतर्गत सूचीबध्दता प्राप्त करुन घेण्यासाठी सोसायटीच्या संकेतस्थळावर **Empanel a Center** या पर्यायावर क्लिक करून नंतर येणाऱ्या फॉर्म मध्ये संस्थेची आवश्यक ती माहिती भरल्यानंतर थेट नोंदणी करता येते. नविन इच्छुक संस्थाना व्यवसाय अभ्यासक्रमांची यादी व इतर आवश्यक माहिती **FAQ** मधील **NCVT Course Syllabus** आणि **NCVT List of Course** या टॅब मध्ये उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे.

५. नविन इच्छुक व्यवसाय प्रशिक्षण संस्थानी नोंदणी केल्यानंतर तपासणीसाठी ऑनलाईन अदा करावयाचे शुल्काव्यतिरिक्त इतर कोणतेही इतर शुल्क रोख स्वरुपात अदा करावे लागत नाही.

६. सामजंस्य करार केलेल्या व सध्या सूचीबध्द असलेल्या संस्थांना नवीन नोंदणी करावयाची असल्यास स्वतंत्ररित्या अर्ज ऑनलाईन स्वरुपात सादर करता येईल. तथापि, यासाठी सामंजस्य करार रद्द केल्याबाबतचे यथोचित कागदपत्रे पुराव्यादाखल सादर करावे लागेल.

तसेच सामजंस्य करार केलेल्या प्रशिक्षण संस्थाकडे प्रशिक्षण सुरू असतानाही सुविधा पुरविणाऱ्या संस्था अर्ज सादर करुन शकतील. तथापि, अशा संस्थाच्या प्रशिक्षण पुर्ण झाल्यानतंरच सुचिबध्दता प्रदान करण्यात येईल.

७. सामजंस्य करार केलेल्या दोन्ही संस्थामध्ये कोणत्याही कारणास्तव वितुष्ट निर्माण झाल्यास त्याबाबतचे निराकरण सदर संस्थांनी आपल्या स्तरावरूनच करावे. याबाबतीत सोसायटीची कोणतीही जबाबदारी असणार नाही, तसेच याबाबत सोसायटीकडे कोणत्याही प्रकारचा पत्रव्यवहार करण्यात येवू नये.

८. दोन्ही संस्थामधील वितुष्टामुळे प्रशिक्षणार्थ्यीच्या प्रशिक्षणामध्ये अथवा रोजगार उपलब्ध करून देण्यामध्ये .अडथळा निर्माण झाल्याचे आढळून आल्यास, सोसायटी व व्यवयास प्रशिक्षण संस्था यांचे दरम्यान झालेल्या करारामधील नमुद अटी व शर्तीमधील खालील नमूद अट क्र. ४.३ नुसार कारवाई करण्यात येईल.

4.3 **Termination :**

4.3.1 In case of non-adherence to provisions of Agreement by the Vocational Training Provider, MSSDS may serve a written notice of 30 (thirty) days period to rectify the non-adherence to the provisions of Agreement by Vocational Training Provider. In case of continuing unsatisfactory performance beyond 30 (thirty) days, MSSDS shall have the right to terminate the Agreement without any further notice. In this eventuality, the Vocational Training Provider shall be liable to refund payments made to it for that all the schemes on the date of termination. The quantum of the amount to be refunded shall be based on the facts and circumstances of the matter and MSSDS shall have the sole right to determine the quantum of the amount to be refunded.

4.3.2 MSSDS may terminate the Agreement in the event, the Vocational Training Partner is found involved in any manner or form in corrupt practices like offering, receiving, or soliciting, directly or indirectly, of anything of value to influence the action of a public official in the selection process or misappropriating the funds/misutilization of funds, which have been marked for the scheme or Fraudulent practice like a misrepresentation or omission of facts in order to influence a selection process or the execution of a contract in contract execution, or Coercive practices like harming or threatening to harm, directly or indirectly, persons or their property to influence their participation in a procurement process, or affect the execution of a contract or Restrictive practice like forming a cartel or arriving at any understanding or arrangement among organizations with the objective of restricting or manipulating the selection process or the execution of a contract.)

(विजय वाघमारे, भा.प्र.से.)
मुख्य कार्यकारी अधिकारी